वाचले:- १) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)
२) मा.आयुक्त यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/०२/कावि/४४७/१५,दि.२०/१०/२०१५
३) मुख्याध्यापक,माध्यमिक विद्यालय लांडेवाडी यांच्याकडील पत्र क्र. ९४/२०२० दि.०४/०५/२०२० रोजीचे पत्र,
४) मा.लेखाधिकारी यांचेकडील पत्र क्र.एच.बी./२९/१३५२/२०१८ दि.१७/०३/२०२० चे घरबांधणी अग्रीम नाहरकत प्रमाणपत्र,
५) माध्यमिक विभागाचा दि.१४/०५/२०२० चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/०१/कावि/२९९/२०२०
दि. १४/०५/२०२०

विषय – नियत वयोमानानूसार सेवानिवृतीबाबत.
श्री.गरदडे अर्जुन मस्कू (सहा.शिक्षक)
( संगणक क्र.५८२०)

आदेश,

श्री.गरदडे अर्जुन म्हस्कू (सहा.शिक्षक) हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर माध्यमिक शिक्षण विभागात दि.०४/१०/१९९० रोजी रूजू झालेले आहेत.श्री.गरदडे अर्जुन म्हस्कू(सहा.शिक्षक) त्यांची जन्म दिनांक ०२/०६/१९६२अशी असून त्यांच्या वयास दि.०१/०६ /२०२० रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने श्री.गरदडे अर्जुन म्हस्कू (सहा.शिक्षक) यांना ३०/०६/२०२० रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ - मधील नियम १० (१) नुसार गट क मधील कर्मचा-यांना वयाची ५८वर्ष पुर्ण होतील,त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यानोत्तर सेवनिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्री.गरदडे अर्जुन म्हस्कू (सहा.शिक्षक) संगणक क्र.५८२० यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही.तसेच श्री.गरदडे अर्जुन म्हस्कू (सहा.शिक्षक)यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज, घरबांधणी कर्ज,वाहन कर्ज,संगणक कर्ज,घरदूरूस्ती कर्ज,वैद्यकीय अग्रीम,कामगार कल्याण कर्ज नाही व इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसलेबाबतचे दाखले त्यांनी सादर केले आहेत.परंतु माध्यमिक शिक्षण सहकारी पतपेढी यांच्याकडील दि.१२/०५/२०२० चे प्रमाणपत्र जावक क्र.०१/२०२०-२०२१ या दाखल्यावरून श्री.गरदडे अर्जुन म्हस्कू सहा.शिक्षक यांच्याकडे रक्कम रूपये- ५,२५,०००/- (अक्षरी रक्कम रूपये पाच लाख पंचवीस हजार रूपये फक्त ) येणे बाकी असल्याचे दिसुन येत आहे.त्यानुसार माध्यमिक शिक्षण सहकारी पतपेढी मर्यादीत मोरवाडी पिंपरी,पुणे-१८ यांना श्री.गरदडे अर्जुन म्हस्कू (सहा.शिक्षक) यांच्या देय रक्कमेतुन रक्कम रूपये- ५,२५,०००/- (अक्षरी रक्कम रूपये पाच लाख पंचवीस हजार रूपये फक्त) कपात करून अदा करणे आवश्यक आहे. माध्यमिक विभागातील भविष्यात इतर काही रक्कम येणे बाकी निघाल्यास सदर रक्कम श्री.गरदडे अर्जुन म्हस्कू (सहा.शिक्षक) यांना मनपा कोषागरात भरणे बंधनकारक राहील.श्री.गरदडे अर्जुन म्हस्कू (सहा.शिक्षक) यांना सेवासातत्य देण्यात आलेले नाही.

सबब,मी शिक्षणाधिकारी,पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८ उपरोक्त वाचले क्र.०२ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन ) नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये श्री.गरदडे अर्जुन म्हस्कू (सहा.शिक्षक) यांना दिनांक - ३०/०६/२०२० रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानूसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

प्रस्तुत आदेशाची सविस्तर नोंद श्री.गरदडे अर्जुन म्हस्कू (सहा.शिक्षक) माध्यमिक विद्यालय लांडेवाडी यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,

श्री.गरदडे अर्जुन म्हस्कू (सहा.शिक्षक) संगणक क्र.५८२०
माध्यमिक विद्यालय लांडेवाडी
प्रतः- १) लेखा शाखा
२)प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन)
सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३)माध्यमिक विभाग टेबल क्रं. ०२ व ०४
४) माध्यमिक विद्यालय लांडेवाडी
२/- पुढील कार्यवाहीसाठी

Scanned by CamScanner